जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे श्रीमती स्मिता चावरे, माजी विधी अधिकारी यांच्याबाबत अनियमितता व गैरकारभार याबाबत कोणतीही तक्रार नसल्यामुळे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे माहिती निरंक असल्याबाबत अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मुदतीत प्रतिसाद नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 6519 / 6513 दि. 19/8/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ९१, ९२ व २३४६/२०२५
एकुण ३ अपीले
श्री.शरद स.कुलकर्णी,
रा.रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नंबर ९६/९७/९८, : अपिलार्थी
देशमुख नगर, गणपती मंदीराच्या मागे, शिवाजीनगर जवळ,
गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

बोर्ड क्र.	जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल
३६ ते ३८	१. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, नवीन प्रशासकीय इमारत तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजुला, छत्रपती संभाजीनगर. २. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, नवीन प्रशासकीय इमारत तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजुला, छत्रपती संभाजीनगर.

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०६.०१.२०२५(२) व १६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ३ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील थोडक्यात विषय
३६	००९१/२०२५	१२.०८.२०२४	राज्याने दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार विभाग निहाय/ मंडळनिहाय/ जिल्हा निहाय मंजुर निधीचा तपशिल मिळणेबाबत व इतर ३ मुद्दयांची माहिती.
३७	००९२/२०२५	२५.०८.२०२४	राज्यातील प्रायोगीक तत्वावर शेजनांच्या नकाशाचे डिजीटलाय--झेशन करण्याच्या कामाचे बीड, लातुर, उस्मानाबाद(धाराशिव),

			हिंगोली येथील कामाच्या निवेदेच्या तपशिलाबाबत एकुण ७ मुद्दयांची माहिती.
३८	२३४६/२०२५	२३.१२.२०२४	तात्कालीन व्यवस्थापकीय संचालक व्हि.बी.नाथ यांच्या कार्यकाळात प्राप्त निधी मागणी पत्रे व त्यासोबतची कागदपत्रे व इतर ३ मुद्यांची माहिती.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.३६ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०२.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने मा.अ.अ.२००५ मधील कलम २(त्र) (एक) नुसार माहितीच्या अवलोकनाची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. अवलोकनानंतर कार्यालयातील उपलब्ध अभिलेखे एकुण ४३ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना टपालाद्वारे पाठविण्यात आलेली आहे. बोर्ड क्र.३७ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१०.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. तसेच बोर्ड क्र.३८ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अभिलेखातील उपलब्ध एकुण ४० पृष्ठांची माहिती नियमाप्रमाणे अपिलार्थीस सशुल्क उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये दडवलेली अर्धी माहिती ७(६) नुसार देणेबाबत आदेशित करण्यात यावे, असे कारण नमुद केलेले आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीचे कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस उपलब्ध माहितीचे प्रदान झाले असल्याचे निदर्शनास येत आहे.

सबब, आयोग खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त ३ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 6514 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. २५४३ व २५४४/२०२५
एकुण २ अपीले

श्री.शरद स.कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.रो-हाऊस क्र.०३, प्लॉट नंबर ९६/९७/९८,
देशमुख नगर, गणपती मंदीराच्या मागे, शिवाजीनगर जवळ,
गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

बोर्ड क्र.	जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल
३९ व ४०	१. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, प्रादेशिक जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर २. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, प्रादेशिक जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण २ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील थोडक्यात विषय
३९	२५४३/२०२५	१३.०१.२०२५	दि.०१ एप्रिल २०२० ते माहिती मिळेपर्यंत विभागीय कार्यालय, हिंगोली ने प्रादेशिक विभागाकडे सादर केलेला परिपुर्ण प्रस्ताव व निधी मागणी पत्र व इतर ३ मुद्दयांची माहिती.

४०	२५४४/२०२५	१३.०१.२०२५	दि.०१ एप्रिल २०२० ते माहिती मिळेपर्यंत विभागीय कार्यालयाकडुन निविदा मंजुरी साठी प्राप्त परिपुर्ण प्रस्ताव व त्यावर सादर व मंजुर टिपण्णी इ.बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.३९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे एकुण ११ पृष्ठांची माहिती विनामुल्य अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच बोर्ड क्र.४० मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने

अपिलार्थी यांनी अवगत केले की, बोर्ड क्र.३९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच बोर्ड क्र.४० मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मुदतीत प्रतिसाद नाही, त्यामुळे आदेश प्राप्त नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना त्यांच्या बोर्ड क्र.३९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. तसेच आज रोजी सुनावणी दरम्यान आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे बोर्ड क्र.४० मधील माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष अपिलार्थीस उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 6515 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ७९८/२०२५
बोर्ड क्र.४१

श्री.बब्रुवान नागनाथ आरदवाड, रा.वंजारवाडी, पो.खंडाळी, ता.अहमदपूर, जि.लातूर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय वंजारवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

आठ घर क्र.१६४ त्याची लांबी व रुंदी सत्य प्रत करुन दिलेल्या कोणत्या ८ अ ला नोंद आहे. त्याची माहिती.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./651/ दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. १०७८ ते १०८२/२०२५
एकुण ५ अपीले

श्री.गौतम गोविंदराव लेंडेगावकर, : अपिलार्थी
मु.लेंडेगाव पो.अंधोरी ता.अहमदपुर जि.लातुर.

विरुध्द

बोर्ड क्र.	जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल
४२ ते ४६	१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय लेंडेगांव, ता.अहमदपुर जि.लातुर २. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकुण ५ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील थोडक्यात विषय
४२, ४५	१०७८/२०२५ व १०८१/२०२५	०८.११.२०२४	मौ.लेंडेगांव ग्रामपंचयतीमध्ये शासन निर्देशानुसर काढलेल्या विविध बँक खात्याची योजनानिहाय तपशिल इ.बाबत.
४३	१०७९/२०२५	०८.११.२०२४	मौ.लेंडेगांव ग्रामपंचायत कार्यालयातील मासिक सभा रजिष्टर, प्रोसीडींग बुक इ.बाबत.
४४	१०८०/२०२५	०८.११.२०२४	मौ.लेंडेगांव ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसभा उपस्थिती, प्रोसीडींग बुक इ.बाबत.

४६	१०८२/२०२५	०८.११.२०२४	मौ.लेंडेगांव ग्रामपंचायतचा १५ वा वित्त आयोग यांचे कॅशबुक, पासबुक आणि ग्रामपंचायत अंतर्गत विकास आराखडे इ.बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या विचाराधिन द्वितीय अपीलांतील ५ हि माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून दिली असता, अपिलार्थी यांनी सदर माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करून देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमुद केलेले आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावरील उपलब्ध कागदपत्रांमध्ये दिसुन येत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे विस्तृत व व्यापक स्वरूपाची माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, लेंडेगाव ता.अहमदपुर जि.लातुर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करून अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयांकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, अपिलार्थी यांना कलम २(त्र) नुसार अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकीत केलेली **प्रती माहिती अर्ज ५० पृष्ठांची** माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्यापेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास सदर माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. या संदर्भात अवलोकनासाठीचा दिनांक व वेळ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरेशा कालावधीपूर्वी जलद गतीने नोंदणीकृत टपालांद्वारे कळवावा.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि. लातुर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ५ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 5711 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील १०८३ व १०८४/२०२५
बोर्ड क्र.४७ व ४८

श्री.रंगनाथ किशनराव पाटील, अपिलार्थी
मु.पो.मावलगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मावलगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

द्वितीय अपील क्र.१०८३/२०२५
मौजे मावलगांव, ता.अहमदपूर, ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसभा प्रोसिडींग बुक, ग्रामसभेला उपस्थित असलेले सभासद इ.बाबत.
द्वितीय अपील क्र.१०८४/२०२५
मौजे मावलगांव, ता.अहमदपूर, ग्रामपंचायत कार्यालयातील मासिक सभा उपस्थिती सभासद रजिस्टर, प्रोसिडींग बुक, ची प्रत इ.बाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार दि.१०.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिली असता, अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दर्शवीलेला आहे. यासंदर्भात पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मुदतीत माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांना व्यक्तीश: माहिती हवी असल्याचे

त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तीश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहिती प्राप्त करून घेणे, माहितीचे शुल्क ज्ञात करून घेणे इ.घडामोडी स्वत:हुन ज्ञात करून घेणे अर्जदाराचे उत्तरदायीत्व असते, मात्र असे उत्तरदायित्व याप्रकरणी अपिलार्थी यांनी पार पाडले असल्याचे आयोगाच्या पटलावरील उपलब्ध कागदपत्रांवरून दिसुन येत नाही. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिल्याचे दिसुन येत आहे. यावरून अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करून घेण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे दिसुन येत आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6519 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील १०८५/२०२५ व १०८६/२०२५
बोर्ड क्र.४९ व ५०

श्री.गणपत भानुदास संपते, अपिलार्थी
मु.पो.मावलगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मावलगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

द्वितीय अपील क्र.१०८५/२०२५
मौजे मावलगांव, ता.अहमदपूर, ग्रामपंचायतचे शासन निर्देशानुसार काढलेल्या विविध बँक खात्याची योजना निहाय स्टेटमेंट सह प्रत.
द्वितीय अपील क्र.१०८६/२०२५
मौजे मावलगांव, ता.अहमदपूर, या ग्रामपंचायतचा १५ वा वित्त आयोग यांचे कॅशबुक, पासबुक, आणि ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर केलेल्या विकास अराखडे इ.बाबत

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमुद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मावलगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ GS18 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ३१९४/२०२५
बोर्ड क्र.५१

श्री.मारोती दत्तु कराड, अपिलार्थी
मु.पो.चिखली, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २२.०४.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी, अहमदपुर यांनी दि.०४.०४.२०२५ रोजी आशा स्वंयसेवीका भरतीबाबत तक्रार चौकशी अहवाल व इतर बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.२१.०४.२०२६ रोजी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तीश: प्राप्त करून घेऊन पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी व्यक्तीश: माहिती प्राप्त करून घेऊन पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6529 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ४२२०/२०२५
बोर्ड क्र.५२

श्री.रघुनाथ धोंडीराम सपकाळ, अपिलार्थी
रा.गुंजोटी, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
गुंजोटी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २६.०५.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

शेवटचा झालेला लेखा परिक्षण अहवाल व पंतप्रधान अवास योजना जुनी व नवीन मंजूर यादी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र/ 6520 दि : 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ४७२१/२०२५
बोर्ड क्र.५३

श्री.विश्वनाथ दत्तराव शिंगडे, अपिलार्थी
मु.पो.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २९.०५.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

घर बांधकाम बाबत दि.२५.०४.२०२५ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाही बाबत एकुण ३ मुद्यांची माहिती

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अर्जातील नमुद विषय हा वडीलोपार्जीत जागेविषयी असुन संबंधितांनी बांधकाम परवानगीसाठी कसलाही अर्ज ग्रामपंचायत कार्यालयास सादर केलेला नसल्याबाबत अपिलार्थीस कळविलेले आहे. याबाबत दि.१७.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळवुन सदर पत्राची प्रत नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन

केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१७.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये टपालाद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र रा इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6521 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ४७२५/२०२५ व ४७२६/२०२५
बोर्ड क्र.५४ व ५५

श्री.सुभाष नागनाथ गुंडीले, अपिलार्थी
रा.टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १७.०६.२०२५ व दि.१६.०५.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

द्वितीय अपील क्र.४७२५/२०२५

रमाई अवास योजना, इंदिरा अवास योजना, पंतप्रधान अवास योजना व इतर घरकुल योजने बाबत एकुण २ मुद्यांची माहिती.

द्वितीय अपील क्र.४७२६/२०२५

ग्रामपंचायत टेंभुर्णी ता.अहमपूर येथील कॅशबुक १५ वा वित्त आयोगातुन कोटेशन व खर्च केलेली माहिती, स्वच्छ भारत मिशन टप्पा २ मध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तीका.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली असल्याने माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व अभिलेखातील उपलब्ध असलेली

माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिली असता, सदर माहिती घेण्यास अपिलार्थी यांनी नकार दिलेला आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला असल्याबाबत आयोगास अवगत केलेले आहे. तथापि याबाबतचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावरील उपलब्ध कागदपत्रांमध्ये दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णी, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी यांना त्यांच्या उक्त माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती कलम २(न) मधील तरतुदीनुसार अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावी व अवलोकनानंतर आदेशात नमुद माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्यापेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास सदर माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. या संदर्भात अपिलार्थी यांना पुरेशा कालावधी पुर्वी अवलोकनासाठीचा दिनांक नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावा.

२. विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6522 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५११९/२०२५
बोर्ड क्र.५६

श्री.गोविंद बालाजी दगडे, अपिलार्थी
रा.उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

दि.०३.०८.२०२२ ते ०८.१०.२०२४ पर्यंतची ग्रामसभेची सुचना बुक, उपस्थिती रजिस्टर, प्रोसिडींग रजिस्टर, ग्रामपंचायत सरपंच यांचे ग्रामसभा व मासिक सभा यांची सत्यप्रत

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली असल्याने माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व अभिलेखातील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिली असता, सदर माहिती घेण्यास अपिलार्थी यांनी नकार दिलेला आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मागितलेली माहिती न मिळाल्याने, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला असल्याबाबत आयोगास अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे व्यक्तीश: माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तीश: माहितीची मागणी केल्यानंतर त्या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करून घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशिल इत्यादी प्राप्त करून घेणे हे अर्जदाराचे

उत्तरदायीत्व असते. तथापि अपिलार्थी यांनी अशी कार्यवाही केल्याचे आयोगाच्या पटलावरील उपलब्ध कागदपत्रांवरून दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व्यक्तीश: उपस्थित राहुन माहिती हस्तगत करावी. अन्यथा त्यांना माहिती मिळवण्यामध्ये स्वारस्य नाही, असे समजण्यात येईल. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय उमरगा कोर्टे, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थी व्यक्तीश: उपस्थित राहील्यास त्यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ GH 94 दि. ~~[illegible]~~ 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५९२१/२०२५
बोर्ड क्र.५७

श्रीमती पार्वती विठ्ठल कदम, मु.हंगरगा, पो.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय हंगरगा/सोरगा, पो.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

२०२१ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामाबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाद्वारे दि.१९.११.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अभिलेखातील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दर्शविलेला आहे. सदर माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती उपलब्ध करून न देता जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करून दिलेली असल्याने सदर माहिती स्विकृत करण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, टाळाटाळ केली, असे कारण नमुद केलेले आहे. सुनावणी दरम्यन झालेला युक्तीवाद व आयोगापुढील कागदपत्रे

विचारात घेता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९(८)(क)(दोन) नुसार आयोगास प्राप्त अधिकारन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करण्यात येत आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली **माहितीसंदर्भात कार्यालयीन कर्मचारी यांचा गट तयार करून सदर माहितीचा शोध घ्यावा व कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती** आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार विनामुल्य अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करून ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R.दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, लातुर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6523 दि. 19/6/2026

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, लातुर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५९२३/२०२५
बोर्ड क्र.५८

श्री.रामेश्वर शिवाजी पवार, अपिलार्थी
मु.पो.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

सन २००२ पासून आज रोजी पर्यंत ८ अ रजिस्टरची झालेल्या नोंदीची कॉपी मिळणे बाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती जिर्ण आवस्थेत असल्याने ते हाताळणे कठीण झालेले आहे. करीता सदर माहितीचे अवलोकन करून हवी असलेली माहिती प्राप्त करून घेणेबाबत, अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी माहितीच्या अवलोकनाकरीता कार्यायात उपस्थित राहीलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व

त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी सदर माहिती करीता कलम २(त्र) नुसार माहितीचे अवलोकन घेणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करून अपिलार्थी यांना अवलोनास्तव उपलब्ध करून द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकीत केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्यापेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास सदर माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करुन द्यावी. या संदर्भात अवलोकनासाठीचा दिनांक व वेळ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरेशा कालावधीपूर्वी जलद गतीने नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावा.

२. विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

५।२।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6524 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५९२३/२०२५
बोर्ड क्र.५९

श्री.विठ्ठल मारोती कदम, मु.हंगरगा, पो.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय हंगरगा/सोरगा, पो.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.०९.२०२५रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

ग्रामपंचायतीने घेतलेल्या मासिक सभा व ऑडीट रिपोर्ट बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाद्वारे दि.१९.११.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अभिलेखातील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात आली. तथापि अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दर्शविलेला आहे. सदर माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती उपलब्ध करून न देता जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करून दिलेली असल्याने सदर माहिती स्विकृत करण्यात आलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, टाळाटाळ केली, असे कारण नमुद केलेले आहे. सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील कागदपत्रे

विचारात घेता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९(८)(क)(दोन) नुसार आयोगास प्राप्त अधिकारन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर यांना आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणुन निश्चित करण्यात येत आहे सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेल्या **माहितीसंदर्भात कार्यालयीन कर्मचारी यांचा गट तयार करून सदर माहितीचा शोध घ्यावा व कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती** आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार विनामुल्य अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर यांना आदेशित करण्यात येते की, शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भातील अभिलेख जतन करून ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार संबंधित पोलीस स्टेशन मध्ये F.I.R.दाखल करण्याची कारवाई करावी, अशी कार्यवाही करताना सर्व वस्तुनिष्ठ बाबींची शहानिशा करण्यात यावी.

३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, लातुर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6525 दि.19/6/2026

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,
१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, लातुर
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपुर जि.लातुर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५९२४/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.शिवाजी निवृत्ती पवार, अपिलार्थी
मु.पा.अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय : उत्तरवादी क्र.१
अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत : उत्तरवादी क्र.२
समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

सन २००० पासून ग्रामपंचायत अंधोरी मधील ग्रामसभेच्या ठरावाचे, मासिक सभेचे इतिवृत्त इ.बाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२२.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने माहितीचे अवलोकन करून हवी असलेली माहिती प्राप्त करून घेणेबाबत, अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरूपाच्या माहितीची मागणी केल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय अंधोरी, ता.अहमदपूर, जि.लातूर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी मागील **एक वर्ष कालावधीची** माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी-पंचायत, पंचायत समिती कार्यालय अहमदपूर, जि.लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6526 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ६०२७/२०२५
बोर्ड क्र.६१

श्री.चामे अंकुश रामचंद्र, अपिलार्थी
मु.पो.चिकली, ता.अहमदपूर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र किनगांव, ता.अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती अहमदपूर, जि.लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १७.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

आशा स्वंयसेवीका पदाची निवडप्रक्रीया राबविल्या संदर्भात शासनाचे परिपत्रक व जाहिर प्रगटन इ.बाबत एकुण ६ मुद्यांची माहिती

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आयोगासमक्ष माहिती उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6527 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ६३४/२०२५
बोर्ड क्र.६२

श्री.राजेश नामदेव अर्जुने, अपिलार्थी
रा.सुगांव, ता.चाकुर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

ग्रामीण जीवनोत्ती अभियानमध्ये शिपाई ते प्रकल्प संचालक पर्यंत सर्व कर्मचारी यांच्या दैनंदीन कामाची नियमावली व इतर २ मुद्यांबाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.२१.०३.२०२५ रोजी प्रथम अपील सुनावणी दरम्यान माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तीश: प्राप्त करून घेऊन स्वाक्षरीत पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी व्यक्तीश: माहिती प्राप्त करून घेऊन पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6528 दि.---19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील १९९३/२०२५
बोर्ड क्र.६३

श्री.मलगिरे लक्ष्मण गणपतराव, अपिलार्थी
रा.शिवनिवास बौध्दी चौक, विक्रमविर हनुमान मंदिरा जवळ, विक्रम नगर, लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शारदासदन अनुसुचित जाती, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आर्वी, ता.जि.लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे विधिज्ञ उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माध्यमिक आश्रम शाळा शासन नियमाप्रमाणे मुख्याध्यापक, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर, लिपीक, स्वयंपाकी, सेवक, यांच्या मान्यतेसाठी संस्थेने जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे दाखल केलेल्या पूर्ण संचिका व इतर ८ मुद्यांची माहिती.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती अद्याप दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हि विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७(७) व कलम ११(१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे हि बाब नैसर्गीक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जन हितच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती

प्रगट करणे आवश्यक आहे. तसेच अशी माहिती उघड केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांना आयोगाने विचारणा केली असता, याबाबत ते आयोगास कोणतेही समर्थनीय उत्तर देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहीत दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6529 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेलें अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या मागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र. ४४७४ ते ४४८३ व ४६९२/२०२५
(एकुण ११ अपीले)

श्री. लक्ष्मण प्रल्हाद पाटील, : अपिलार्थी
रा.सुमठाणा पो.टाकळी (वा.) ता.उद्गीर जि.लातुर. अनुपस्थित

विरुध्द

बोर्ड क्र.	जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल	
६४, ६७, ७२, ७४	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शारदासदन अनु-जाती माध्यमिक आश्रमशाळा, आर्वी ता. जि.लातुर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर	उपस्थित (ज.मा.अ.यांचे विधिज्ञ उपस्थित) प्रतिनिधी उपस्थित
६५, ७१	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, धुरपतमाता अनु-जाती माध्यमिक आश्रमशाळा, उद्गीर ता.उद्गीर जि. लातुर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर	उपस्थित प्रतिनिधी उपस्थित
६६, ६८	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कृष्णा माता अनु-जाती माध्यमिक आश्रमशाळा, उद्गीर ता.उद्गीर जि.लातुर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर	उपस्थित प्रतिनिधी उपस्थित
६९, ७३	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अनु-जाती प्राथमिक आश्रमशाळा, उद्गीर ता.उद्गीर जि.लातुर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर	उपस्थित प्रतिनिधी उपस्थित
७०	जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातुर प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातुर	उपस्थित प्रतिनिधी उपस्थित

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये उपरोक्त नमुद एकुण ११ द्वितीय अपिले दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहितीचा थोडक्यात विषय
६४	४४७४/२०२५	११.०७.२०२५	सन २०२० ते २०२५ या कालावधीतील शाळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यादी, नाव, पद, शैक्षणीक पात्रता, नियुक्ती आदेश, नियुक्ती दिनांक इ.बाबत.
६५	४४७५/२०२५	११.०७.२०२५	सन २०१५ ते २०२५ या वर्षातील नवीन नियुक्तांची संपुर्ण प्रक्रिया, जाहीरात, अर्जाची यादी, मुलाखतीचे गुण, निवड समितीचा अहवाल, अंतिम आदेश इ.बाबत.
६६	४४७६/२०२५	१२.०७.२०२५	सन २०२० ते २०२५ या कालावधीतील शाळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यादी, नाव, पद, शैक्षणीक पात्रता, नियुक्ती आदेश, नियुक्ती दिनांक इ.बाबत.
६७	४४७७/२०२५	०२.०७.२०२५	इ.स.२०१४ ते २०२५ शाळेत प्रत्येक वर्षी घेण्यात आलेल्या परिक्षा व उपस्थित विद्यार्थी व निकालाचा तपशिल, वर्गनिहाय व जातीनिहाय विद्यार्थी संख्या यादी इ.बाबत.
६८	४४७८/२०२५	-	सन २०१५ ते २०२५ प्रत्येक वर्षी घेण्यात आलेल्या परिक्षा उपस्थित विद्यार्थी व निकालाचा तपशिल, शाळेच्या मालकी हक्कासंदर्भातील कागदपत्रे इ.
६९	४४७९/२०२५	०२.०७.२०२५	सन २०१५ ते २०२५ प्रत्येक वर्षाचे वर्गनिहाय विद्यार्थी संख्या, परिक्षा, निकाल इ.बाबत
७०	४४८०/२०२५	०९.०६.२०२५	शाळेतील रोहित संदीपान बेसके यांना ST च्या जागेवर नेमलेल्या शिक्षकाच्या मान्यता संचिकेची प्रत, हजेरी मस्टर इ.बाबत.
७१	४४८१/२०२५	०२.०७.२०२५	सन २०१५ ते २०२५ शाळेतील सर्व शिक्षकांनी TET पात्रता परिक्षा दिल्याचे व उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्रत व इ.बाबत.
७२	४४८२/२०२५	१२.०७.२०२५	सन २०१५ ते २०२५ या कालावधीतील शळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यादी, नावे, पद, शैक्षणीक पात्रता, नियुक्ती आदेश, इ.बाबत.
७३	४४८३/२०२५	१२.०७.२०२५	सन २०१५ ते २०२५ शिक्षक गुणवत्ता निरीक्षण अहवाल, आरोग्य तपासणी अहवाल, डॉक्टरांची माहिती, शिक्षक व कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश, हजेरी रजिस्टर, शाळेची नोंदणी प्रमाणपत्र इ.बाबत.
७४	४६९२/२०२५	०४.०८.२०२५	सन २०१७ ते २०२४ प्रयोगशाळा परिचर पदास मान्यता, आदेशाची प्रत, नियुक्ती आदेश प्रत, कार्यभार स्विकारपत्र इ.बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवादात अवगत केले की, अपिलार्थी हे सातत्याने माहितीचे अर्ज सादर करतात. सदर माहिती अर्जाद्वारे विस्तृत, व्यापक, विश्लेषणात्मक स्वरूपाच्या माहितीची मागणी करतात. तसेच मागणी केलेल्या माहितीशी अपिलार्थी यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. अपिलार्थी यांच्या वांरवार अर्ज करण्याच्या भुमिकेचा दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर तसेच शैक्षणीक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे. बहुतांशवेळा, अपिलार्थी हे माहिती अर्जाद्वारे मोघम स्वरूपाच्या माहितीची मागणी करतात त्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे

याचा बोध होत नाही. त्यामुळे बहुतांशवेळा माहितीचे अपिलार्थीस प्रदान करता येणे शक्य होत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली विस्तृत स्वरूपाची माहिती एकत्रीत अथवा संकलीत करावायाची झाल्यास त्यासाठी वाजवी पेक्षा जास्त मनुष्यबळ व साधनसामुग्री वळवावी लागते. सद्यस्थितीत शाळा प्रशासनाकडे अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे महत्वाचे शैक्षणीक कामकाज प्राधान्याने पुर्ण करून प्राप्त माहिती अर्जांवर कार्यवाही करतांना जन माहिती अधिकारी यांना तारेवरची कसरत करावी लागते, ही बाब सविनय आपल्या निदर्शनास आणुन देण्यात येत आहे. मात्र याचा विपरीत परिणाम शैक्षणीक कामकाजावर होऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस नैसर्गीक न्याय देता येणे शक्य होत नाही. अपिलार्थी यांच्या प्रस्तुत प्रकरणातील प्राप्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. यासर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार होऊन आज रोजी अपिलार्थी यांची विचाराधिन असलेली सर्व द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती अद्याप उपलब्ध करून दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे विधिज्ञ यांनी आयोगासमक्ष केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक स्वरूपाची, त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक स्वरूपाची तसेच विविध विषयाशी निगडीत असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली विस्तृत स्वरूपाची माहिती एकत्रीत / संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामुग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार आहे. ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरणार नाही. यामुळे असे माहितीचे अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाहीत. तसेच त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीशी मागणी केल्यानंतर कलम ७(७) व ११(१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे ही बाब नैसर्गीक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जन हिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. मात्र याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीमध्ये अधिनियमातील कलम ८(१) (त्र) नुसार कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. किंवा अशी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती उघड केल्यास नेमके कोणते जनहीत साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपीलांमध्ये काहीही नमुद केलेले नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती ही एकापेक्षा अधिक विषयाशी संबंधित असुन याबाबत असे नमुद करण्यात येत आहे की, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली

सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर १५० शब्दांच्या मर्यादेत माहितीची मागणी अनुज्ञेय आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, याप्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अपिलार्थी यांची उपरोक्त ११ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।१२

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6530 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५३०१/२०२५
बोर्ड क्र.७५

श्री.संतोष वासुदेव तायडे, अपिलार्थी
द्वारा.सचिन कांबळे, राजनगर, उदय पेट्रोल पंप समोर नांदेड रोड,
उदगीर, जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वयें द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

कार्यालयातील दिव्यांग विभागाच्या आवक तसेच जावक रजिस्टर मधील दिनांक ०१.०४.२०२५ ते माहिती मिळेपर्यंतची नोंदीच्या प्रती व इतर बाबत

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे एकुण ८२ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आलेली आहे. करीता विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन

केले असता, जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6531 दि.---19/6/2026---

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५३०२/२०२५
बोर्ड क्र.७६

श्री.सुनिल भाऊसाहेब महाले, अपिलार्थी
द्वारा- डी.बी.कांबळे सर, पंचशीला नगर, उदयगीरी कॉलेज समोर,
सोमनाथपूर, ता.उदगीर जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०६.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

राजश्री शाहु निवासी मुकबधीर विद्यालय उदगीर या शाळेतील आपल्या कार्यालयामार्फत अदा केलेल्या वेतन अनुदाना व्यतीरिक्त इतर सर्व सन २०१४ ते एप्रिल २०२४ या कालावधीतील अनुदानाचे आदेश तसेच त्यांच्या जावक रजिस्टरच्या नोंदी इ.बाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये दि.२७.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. करीता विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगाच्या पटलावरील उपलब्ध कागदपत्रांवरून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे राजश्री शाहु निवासी मुकबधीर विद्यालय उदगीर या शाळेतील आपल्या कार्यालयामार्फत अदा केलेल्या वेतन अनुदाना व्यतीरिक्त इतर सर्व सन २०१४ ते एप्रिल २०२४ या कालावधीतील अनुदानाचे आदेश तसेच त्यांच्या जावक रजिस्टरच्या नोंदी बाबत माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सदर माहिती कलम 8(1) (j) नुसार सार्वजनिक व व्यापक जनहित साध्य

करणारी नसल्याबाबत अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना अभिलेखातील उपलब्ध माहिती १५ दिवसात विनामुल्य पुरविणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6532 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील २६१२/२०२५
बोर्ड क्र.७७

श्री.व्यंकट भगवानराव कदम, अपिलार्थी
रा.उषा किरण पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, बार्शी रोड, लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०४.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

२०२४-२०२५-२६ संपूर्ण अनुज्ञप्ती नुतणी करणासाठी मिळालेले अर्ज त्याचे कागदपत्र नकाशे, व्हॅट कायद्या अंतर्गत प्रलंबीत मद्यविक्रेत्याची थकबाकी इ.बाबत

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अतिशय विस्तृत व व्यापक आहे. त्यामध्ये संदिग्धता आहे. अर्जदाराने कोणत्याही अनुज्ञप्तीधारकांचे नांव किंवा अनुज्ञप्तीचा प्रकार नोंदविलेला नाही. त्यामुळे माहिती देता येणे शक्य नाही. नुतनीकरणासंदर्भात नकाशामध्ये केलेले अंतर्गत बदलाबाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. यासंदर्भात अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी जोडपत्र अ अन्वये मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सदर माहितीकरीता अपिलार्थी यांनी कलम २(त्र) नुसार माहितीचे अवलोकन घेणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत एक दिवस निश्चित करुन अपिलार्थी यांना त्यांच्या उक्त माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी एक वर्ष कालावधीची माहिती कलम २(त्र) मधील तरतुदीनुसार अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना नेमक्या कोणत्या एक वर्ष कालावधीची माहिती हवी आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्यापेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास सदर माहिती अपिलार्थी यांना नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करून द्यावी. या संदर्भात अपिलार्थी यांना पुरेशा कालावधी पुर्वी अवलोकनासाठीचा दिनांक नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावा.

२. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 6493 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील ५६९८/२०२५
बोर्ड क्र.७८

श्री.सोमनाथ दामोधर ढगे, अपिलार्थी
मु.पो.बोधगांव बु.ता.जि.लातूर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क लातूर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०८.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

लातूर तालुक्यातील बियर बार हॉटेल वर अवैध दारुसाठी व इतर संबंधी केलेल्या कारवाई बाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेल्या लातुर जिल्हयातील बिअर बार हॉटेल संदर्भातील यादी त्यांच्या व्हॉट्सॲप नंबर पाठविण्यात आलेली असुन दि.२९.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे गुन्हा अन्वेषण संदर्भातील सन जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०२५ पर्यंत अभिलेखावर उपलब्ध असलेली एकुण १३ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना व्यक्तीश: उपलब्ध करून दिलेली आहे. करीता विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिलेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादात अवगत

केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२९.०९.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./6533 दि. 19/6/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्र. ३४२४/२०१६

श्री.महारुद्र नारायण सावंत, : अपिलार्थी
रा.उखळी ता.सोनपेठ जि.परभणी.

विरुध्द

बोर्ड क्र.	जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल
८०	१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.केदारेश्वर विद्यामंदीर उखळी बु., ता.सोनपेठ जि.परभणी २. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी

(सुनावणी दिनांक २२.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०८.२०१६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल केलेल्या द्वितीय अपीलावर आयोगाने दि.०८.११.२०१७ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे. सदर द्वितीय अपिलाच्या निर्णयाविरुद्ध अपिलार्थी यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे रिट याचिका क्र.१२०४१/२०१९ दाखल केलेली आहे. सदर रिट याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.१७.०२.२०२६ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहे.

" In view of the above the impugned order dated ०८.११.२०१७ passed by the State Information Commission, Bench at Aurangabad, in Appeal No.३४२४ of २०१६ is set aside.The concerned authority is directed to decide the appeal afresh after granting an opportunity of hearing to the petitioner. "

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणाची दि.२२.०४.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याबाबत अपिलार्थी व प्रतिवादी यांना आयोगाकडील नोटीसद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे विधिज्ञ उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील थोडक्यात विषय
८०	३४२४/२०१६	११.०४.२०१६	१. आपल्या शाळेतील तीन पदे खाली होते ते कोणत्या शैक्षणीक नियमानुसार तीन पदे भरली त्याची माहिती. २. पदे भरण्यासाठी त्यांचे जाहीर प्रगटन काढले होते का? त्या जाहीरातीची झेरॉक्स प्रत. ३. शाळेतील सर्व जातीनिहाय शिक्षकाची पदाची माहिती. ४. शाळेतील एकुण विद्यार्थी पटसंख्या लेखी देणे. त्याच्यावर खाऊचा झालेला, तांदळाचा एक वर्ष रजिस्टरच्या नोंदीची माहिती. ५. संस्थेच्या सर्व पदे भरण्याचा अधिकार कोणत्या कलमानुसार देण्यात आला त्या कलमासहीत माहिती.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.केदारेश्वर विद्यामंदीर उखळी बु., ता.सोनपेठ जि.परभणी,यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती,आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र.6534 दि. 19/6/2024